# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६.०४.२०२४

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१०.०४.२०२४ ते १६.०४.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७.०४.२०२४ ते २१.०४.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ४ | ३ | ३ | ० | ० |
| ३९.४ | ३९.० | ३९.० | ३९.० | ३९.० | ३८.५ | ३९.० | कमाल तापमान (अं.से.) | ४० | ४१ | ४२ | ४१ | ४१ |
| २१.५ | २२.० | २२.२ | २१.८ | २१.० | २५.० | २५.० | किमान तापमान (अं.से.) | २७ | २७ | २८ | २७ | २७ |
| २ | १ | २ | ० | १ | ० | ० | स. ढग स्थिती (आकाश) | ४ | ७ | ३ | ४ | ६ |
| ३ | २ | १ | ० | २ | ० | - | दु. ढग स्थिती (आकाश) | | | | | |
| ७२ | ७६ | ७२ | ७७ | ८० | ७८ | ७९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ७८ | ६० | ४४ | ५३ |
| ५१ | ४५ | ४७ | ४८ | ६२ | ५५ | ६३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २९ | ३५ | ३६ | २८ | २६ |
| ३.० | १.३ | १.४ | ३.७ | २.२ | १.५ | ०.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ११ | १२ | ९ | ११ | १० |
| प. नै | वा. | प.वा. | उ. ई | प.नै. | द.नै. | .द. | स. वाऱ्याची दिशा | प.नै | प.नै | प. | प. | द.आ. |
| ऊ. | प. | द.नै | प.वा | पु.आ. | पु.ई | - | दु. वाऱ्याची दिशा | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक १७, १९ व २० एप्रिल दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तर दिनांक १८ व २१ एप्रिल रोजि आकाश सामन्यात: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक १७, १८ व १९ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. पुढील ५ दिवस कमाल तापमान ४०.० ते ४२.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २७.० ते २८.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ४४ ते ७८% तर दुपारची सापेक्ष आद्रता २६ ते ३६ % दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ९ ते १२ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १७ ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ शेतकरी बांधवांनी शेतातील कामे शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी करून घ्यावीत. कमाल तापमान ४२.० अंश सेल्सिअस पर्यंत वाढण्याची शक्यता असल्याने दुपारच्या वेळी शेतात काम करणे टाळावे. बाहेर पडताना सैल, सौम्य रंगाची कपडे वापरा. टोपी, रुमाल, छत्री वापरा. सावलीच्या ठिकाणी थांबा. दुपारी १२ ते ३ उन्हात फिरू नका.<br>➢ कमाल तापमान ४२.० अंश सेल्सिअस पर्यंत वाढण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशूधनाची काळजी घ्यावी.<br>➢ उन्हाळी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी शक्यतो तुषार आणि ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा.<br>➢ फळे व भाजीपाला पिकांमध्ये आच्छादनाचा वापर करावा.पिकांना पाणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी द्यावे.<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त आहार, हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ जास्त तापमानामध्ये पिकांना रासायनिक खते देणे टाळावे. |
| संदेश | | ➢ नवीन लागवड केलेल्या फळबागांमध्ये रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली देण्याची व्यवस्था करावी जेनेकरुन कोवळया रोपांचे प्रखर उन्हापासून संरक्षण होईन. |
| ज्वारी | पक्वता | ➢ ज्वारी काढणी नंतर कडबा सुरक्षित ठिकाणी ठेवावा .सुरक्षित ठिकाणी ठेवणे शक्य नसल्यास ज्वारी कडबा पॉलीथिनच्या पेपरने झाकून घ्यावा. |
| मका | पक्वता | ➢ पक्व मका पिकाची काढणी करावी. काढणी केलेली कणसे उन्हामध्ये वाळवावीत व नंतर मळणी करून तयार झालेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| भुईमुग | वाढीची | ➢ भुईमुग पिकातील सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी ०.५% लोह व ०.२ % झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ५० व ७०दिवसांनी फवारणी करावी.<br>➢ उन्हाळी भुईमूग पिकास जमिनीच्या मगदूराप्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. |
| ऊस | वाढीची | ➢ उस पिकास १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. शक्य असल्यास उसात पाचटाचे आच्छादन करावे. पाणी कमी असल्यास उसाला |

**ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन**

**ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर**

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | एक सरी आड पाणी द्यावे. |
| मिरची | वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्याने काही ठिकाणी वांगी पिकावर कोळी किडीचा प्रादुर्भाव दिसून येऊ शकतो. प्रादुर्भाव दिसून येताच पिकावर फेनप्रोपॅथ्रीन ३०% ईसी ५ मिली किंवा फेनॅक्झाक्विन १०% ई.सी. २५ मिली १० लीटर पाण्यातून फवारावे. |
| आंबा | फळ पक्वता | ➢ आंबा पिकामध्ये तयार झालेली फळे नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.<br>➢ उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी आणि फळांमध्ये साका तयार होण्याचे टाळण्यासाठी काढलेली फळे सावलीत ठेवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. |
| केळी | पक्वता | ➢ केळी फळ बागेस आवश्यकतेनुसार पाणी उपलब्ध करुन द्यावे. |
| नारळ | वाढीची | ➢ उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| पशुधन | वाढीची | **पुढील ५ दिवस कमाल तापमान ४२.० अंश सेल्सिअस पर्यंत वाढण्याची शक्यता असल्याने जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...**<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |

ठिकाण :१६.०४.२०२४

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**